225

# महाराष्ट्र शासन

Umed/MSRLM/SM & IB/जा.क्र. 921 /२०१६
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग
सिडको भवन, पाचवा मजला (दक्षिण कक्ष)
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दिनांक : 26/5/2016

प्रति,
जिल्हा अभियान व्यवस्थापक
जिल्हा अभियान कक्ष
सर्व जिल्हे.

**विषय : वर्ष २०१६-१७ PWD (Person with Disability) सुधारित (Revised) मार्गदर्शिकेबाबत.**
**संदर्भ : MSRLM/Sm & IB/प्र.क्र. ४०४/जा.क्र.१०४९/२०१५ दि. ६/६/२०१५.**

वरील संदर्भिय पत्रान्वये जुन २०१५ मध्ये PWD मार्गदर्शिका जिल्हयांना कळविण्यात आल्या होत्या. यामध्ये मागील वर्षामध्ये जिल्हयांनी दिलेल्या सूचनान्वये काही बदल करण्यात आलेले आहेत. तरी वर्ष २०१६ - १७ पासून सोबत जोडलेल्या सुधारित (Revised) मार्गदर्शिकेच्या अधिन राहून DPGs चे गट तयार करण्यात यावेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

225

# महाराष्ट्र शासन

Umed/MSRLM/SM & IB/जा.क्र. 921 /२०१६
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग
सिडको भवन, पाचवा मजला (दक्षिण कक्ष)
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दिनांक : 26/5/2016

प्रति,
जिल्हा अभियान व्यवस्थापक
जिल्हा अभियान कक्ष
सर्व जिल्हे.

**विषय : वर्ष २०१६-१७ PWD (Person with Disability) सुधारित (Revised) मार्गदर्शिकेबाबत.**
**संदर्भ : MSRLM/Sm & IB/प्र.क्र. ४०४/जा.क्र.१०४९/२०१५ दि. ६/६/२०१५.**

वरील संदर्भिय पत्रान्वये जुन २०१५ मध्ये PWD मार्गदर्शिका जिल्हयांना कळविण्यात आल्या होत्या. यामध्ये मागील वर्षामध्ये जिल्हयांनी दिलेल्या सूचनान्वये काही बदल करण्यात आलेले आहेत. तरी वर्ष २०१६ - १७ पासून सोबत जोडलेल्या सुधारित (Revised) मार्गदर्शिकेच्या अधिन राहून DPGs चे गट तयार करण्यात यावेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

Umed
New Visions, Renewed Confidence

# उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## अपंग व्यक्तींचे स्वयंसहाय्यता गट बनविण्याबाबत मार्गदर्शिका

**प्रास्ताविक:**

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने आपल्या कार्यक्रमात अपंग व्यक्तींचा समावेश केला आहे. या व्यक्तींच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने एक पाऊल म्हणून अपंग व्यक्तींचे स्वयंसहाय्यता गट करण्याचे ठरविले आहे. इतर स्वयंसहाय्यगटाच्या धर्तीवरच हे गट तयार करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. हे गट संपूर्णत: अपंग व्यक्तींचेच असतील.

अपंगांना मिळणारा आधार आणि सेवा तुटपुंज्या असल्याने ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतात हे उघड सत्य आहे. अपंगांप्रती असलेल्या या बेपर्वाईच्या वर्तनामुळे बहुसंख्य अपंग व्यक्तींना त्यांच्यासाठी विकसित केलेल्या योजनांची प्राथमिक माहिती व ज्ञान नाही. अपंगानी इतर व्यक्तींप्रमाणेच मुख्य प्रवाहात यावे, यासाठी त्यांच्या संघटना तयार व्हायला हव्यात. या संघटना बांधणीसाठी त्यांना चालना देण्यासाठी आणि त्यांच्या सशक्तीकारणासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत.

**ध्येय आणि उद्दिष्टे:**

1. अपंगांना समाजामध्ये सन्मानाचे व न्याय्य स्थान मिळावे या दृष्टीने प्रयत्न करणे.
2. अपंगांना गावामध्ये सामाजिक, आर्थिक, भावनिक पातळीवर आधार मिळावा म्हणून प्रयत्न करणे.
3. अपंगत्वाच्या मुद्द्याबाबत माहिती केंद्र म्हणून विकसित होण्याच्यादृष्टीने अपंगांच्या स्वयंसहाय्यता गटांचे सबलीकरण करणे.
4. तालुका पातळीवर समूह संघटन (क्लस्टर) जिल्हा पातळीवर समूहसंघ (फेडरेशन) आणि राज्यपातळीवर समुहासंघांचे संपर्काचे जाळे (नेटवर्क) प्रस्थापित करणे.
5. गावपातळीवर माहिती देखरेख यंत्रणा स्थापन करणे (एमआयएस).
6. उमेद अभियानामध्ये तालुका पातळीवरील यंत्रणा हे काम पहिल. अपंगांच्या गटांची बांधणी त्या गटाचे संवर्धन करण्याची प्रमुख जबाबदारी गावातील प्रेरिका, प्रभाग समन्वयक आणि तालुका अभियान व्यवस्थापक यांची राहील.

   अपंग स्वयंसहाय्यता गटांच्या गरजांच्या पडताळणीचे अहवाल एकत्रित केल्यानंतर उमेद अभियान या गटांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी विशेष आर्थिक तरतूद करेल. या आर्थिक तरतुदीमध्ये आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, अपंगाच्या संचार सुलभते संदर्भातील बाबी व इतर सहाय्यक योजना आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, जीवनोन्नती यांचा समावेश असेल.

**स्वयंसहाय्यता गटासंदर्भातील महत्वाच्या बाबी:**

लोकांना आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीकरणासाठी उपजीविकेची साधने/संधी निर्माण करणे स्वयंसहाय्यता संकल्पना आणि प्रक्रिया कमालीची यशस्वी ठरली आहे. ही संकल्पना अपंगांच्यासंदर्भात राबवल्यावर तिथेही यश मिळतेच पण, स्वयंसहाय्यता संकल्पना राबवण्याआधी काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. स्वयंसहाय्यता गटाच्या व्याख्येतच हा एक 'गट' असल्याचे गृहीत आहे. त्यामुळे गटामधील सदस्यामध्ये परस्पर विश्वास, एकजिनसिपणा, सहकार्य असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी गटात असतील तरच आपण गटाला आर्थिक व्यवहार करण्याबाबत सांगू शकतो. नाहीतर गटातील सदस्यांमध्ये फुट पडून गट मोडण्याची शक्यता असते. हे गट गावातील इतर लोकांशीही जोडलेले असणे आवश्यक आहे. यामध्ये महिला आणि मुलांनाही यांनाही सामावून घ्यायला हवे.

**उमेद अभियानांतर्गत अपंग स्वयंसहाय्यता गटाची रचना आणि आराखडा:**

**अपंग व्यक्ती म्हणजे कोण?**

अपंग व्यक्तिबाबतच्या १९९५ च्या कायद्यानुसार आणि नॅशनल ट्रस्ट ॲक्ट २००० नुसार ज्या व्यक्तिला शारीरिक / मानसिक / भावनिक अपंगत्व आहे, अशा व्यक्तिला अपंग म्हटले म्हणले जाते. उदा. अस्थिव्यंग, कर्णबधीरत्व, मुकाबधीरत्व, अंध, मतिमंद, मेंदूचा पक्षाघात (सेरेब्रलपाल्सी), स्वमग्नता (ऑटीजम) अध्ययन अक्षमता (लर्निंग डिस्अबिलिटी), कुष्ठरोग, मानसिक आजार, बहुविकलांगता (वर उल्लेख केलेल्या अपंगत्वाची एकापेक्षा अधिक लक्षणे असणारे अपंगत्व)

अपंगांबाबत होणारे सामाजिक भेदभाव लक्षात घेता ४० टक्क्यांहून कमी शारीरिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना (उदा: हाताचे एक बोट गमावलेली व्यक्ती, एका डोळ्याने अंध व्यक्ती, अर्ध कर्णबधिरत्व असणारी व्यक्ती इत्यादी) सुध्दा या गटात सदस्य म्हणून घेता येईल. मात्र त्यासाठी अपंग स्वयंसहाय्यता गटातील ६० टक्के सदस्यांची मान्यता आवश्यक असेल. गटातून कर्ज देण्यासंदर्भात निर्णय घेताना त्या व्यक्तीची असहाय्यता लक्षात घेऊन त्यानुसार त्या व्यक्तिला प्राधान्य दिले जाईल. हे गट अपंगाचे असल्याने (विशेष गट) काही अडचणीही लक्षात घ्यायला हव्यात.

1. गावातील अपंगांची संख्या (जवळपासच्या गावातील)
2. एकाच प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती
3. अपंग व्यक्तींमधील स्त्री-पुरुष प्रमाण.
4. अपंग स्वयंसहाय्यता गटांचे सदस्य बनण्यासाठीचा वयोगट
5. बहुविकलांगता, मानसिक आजार, मतिमंदत्व आणि मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या व्यक्तींच्या समवेशासंदर्भातील अडचणी.

225

# महाराष्ट्र शासन

Umed/MSRLM/SM & IB/जा.क्र. 921 /२०१६
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग
सिडको भवन, पाचवा मजला (दक्षिण कक्ष)
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दिनांक : 26/5/2016

प्रति,
जिल्हा अभियान व्यवस्थापक
जिल्हा अभियान कक्ष
सर्व जिल्हे.

**विषय : वर्ष २०१६-१७ PWD (Person with Disability) सुधारित (Revised) मार्गदर्शिकेबाबत.**
**संदर्भ : MSRLM/Sm & IB/प्र.क्र. ४०४/जा.क्र.१०४९/२०१५ दि. ६/६/२०१५.**

वरील संदर्भिय पत्रान्वये जुन २०१५ मध्ये PWD मार्गदर्शिका जिल्हयांना कळविण्यात आल्या होत्या. यामध्ये मागील वर्षामध्ये जिल्हयांनी दिलेल्या सूचनान्वये काही बदल करण्यात आलेले आहेत. तरी वर्ष २०१६ - १७ पासून सोबत जोडलेल्या सुधारित (Revised) मार्गदर्शिकेच्या अधिन राहून DPGs चे गट तयार करण्यात यावेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

# उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## अपंग व्यक्तींचे स्वयंसहाय्यता गट बनविण्याबाबत मार्गदर्शिका

**प्रास्ताविक:**

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने आपल्या कार्यक्रमात अपंग व्यक्तींचा समावेश केला आहे. या व्यक्तींच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने एक पाऊल म्हणून अपंग व्यक्तींचे स्वयंसहाय्यता गट करण्याचे ठरविले आहे. इतर स्वयंसहाय्यगटाच्या धर्तीवरच हे गट तयार करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. हे गट संपूर्णत: अपंग व्यक्तींचेच असतील.

अपंगांना मिळणारा आधार आणि सेवा तुटपुंज्या असल्याने ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतात हे उघड सत्य आहे. अपंगांप्रती असलेल्या या बेपर्वाईच्या वर्तनामुळे बहुसंख्य अपंग व्यक्तींना त्यांच्यासाठी विकसित केलेल्या योजनांची प्राथमिक माहिती व ज्ञान नाही. अपंगानी इतर व्यक्तींप्रमाणेच मुख्य प्रवाहात यावे, यासाठी त्यांच्या संघटना तयार व्हायला हव्यात. या संघटना बांधणीसाठी त्यांना चालना देण्यासाठी आणि त्यांच्या सशक्तीकारणासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत.

**ध्येय आणि उद्दिष्टे:**

1. अपंगांना समाजामध्ये सन्मानाचे व न्याय्य स्थान मिळावे या दृष्टीने प्रयत्न करणे.
2. अपंगांना गावामध्ये सामाजिक, आर्थिक, भावनिक पातळीवर आधार मिळावा म्हणून प्रयत्न करणे.
3. अपंगत्वाच्या मुद्द्याबाबत माहिती केंद्र म्हणून विकसित होण्याच्यादृष्टीने अपंगांच्या स्वयंसहाय्यता गटांचे सबलीकरण करणे.
4. तालुका पातळीवर समूह संघटन (क्लस्टर) जिल्हा पातळीवर समूहसंघ (फेडरेशन) आणि राज्यपातळीवर समुहासंघांचे संपर्काचे जाळे (नेटवर्क) प्रस्थापित करणे.
5. गावपातळीवर माहिती देखरेख यंत्रणा स्थापन करणे (एमआयएस).
6. उमेद अभियानामध्ये तालुका पातळीवरील यंत्रणा हे काम पहिल. अपंगांच्या गटांची बांधणी त्या गटाचे संवर्धन करण्याची प्रमुख जबाबदारी गावातील प्रेरिका, प्रभाग समन्वयक आणि तालुका अभियान व्यवस्थापक यांची राहील.

   अपंग स्वयंसहाय्यता गटांच्या गरजांच्या पडताळणीचे अहवाल एकत्रित केल्यानंतर उमेद अभियान या गटांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी विशेष आर्थिक तरतूद करेल. या आर्थिक तरतुदीमध्ये आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, अपंगाच्या संचार सुलभते संदर्भातील बाबी व इतर सहाय्यक योजना आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, जीवनोन्नती यांचा समावेश असेल.

**स्वयंसहाय्यता गटासंदर्भातील महत्वाच्या बाबी:**

लोकांना आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीकरणासाठी उपजीविकेची साधने/संधी निर्माण करणे स्वयंसहाय्यता संकल्पना आणि प्रक्रिया कमालीची यशस्वी ठरली आहे. ही संकल्पना अपंगांच्यासंदर्भात राबवल्यावर तिथेही यश मिळतेच पण, स्वयंसहाय्यता संकल्पना राबवण्याआधी काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. स्वयंसहाय्यता गटाच्या व्याख्येतच हा एक 'गट' असल्याचे गृहीत आहे. त्यामुळे गटामधील सदस्यामध्ये परस्पर विश्वास, एकजिनसिपणा, सहकार्य असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी गटात असतील तरच आपण गटाला आर्थिक व्यवहार करण्याबाबत सांगू शकतो. नाहीतर गटातील सदस्यांमध्ये फुट पडून गट मोडण्याची शक्यता असते. हे गट गावातील इतर लोकांशीही जोडलेले असणे आवश्यक आहे. यामध्ये महिला आणि मुलांनाही यांनाही सामावून घ्यायला हवे.

**उमेद अभियानांतर्गत अपंग स्वयंसहाय्यता गटाची रचना आणि आराखडा:**

**अपंग व्यक्ती म्हणजे कोण?**

अपंग व्यक्तिबाबतच्या १९५५ च्या कायद्यानुसार आणि नॅशनल ट्रस्ट ॲक्ट २००० नुसार ज्या व्यक्तिला शारीरिक / मानसिक / भावनिक अपंगत्व आहे, अशा व्यक्तिला अपंग म्हटले म्हणले जाते. उदा. अस्थिव्यंग, कर्णबधीरत्व, मुकाबधीरत्व, अंध, मतिमंद, मेंदूचा पक्षाघात (सेरेब्रलपाल्सी), स्वमग्नता (ऑटीजम) अध्ययन अक्षमता (लर्निंग डिस्अबिलिटी), कुष्ठरोग, मानसिक आजार, बहुविकलांगता (वर उल्लेख केलेल्या अपंगत्वाची एकापेक्षा अधिक लक्षणे असणारे अपंगत्व)

अपंगांबाबत होणारे सामाजिक भेदभाव लक्षात घेता ४० टक्क्यांहून कमी शारीरिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना (उदा: हाताचे एक बोट गमावलेली व्यक्ती, एका डोळ्याने अंध व्यक्ती, अर्ध कर्णबधिरत्व असणारी व्यक्ती इत्यादी) सुध्दा या गटात सदस्य म्हणून घेता येईल. मात्र त्यासाठी अपंग स्वयंसहाय्यता गटातील ६० टक्के सदस्यांची मान्यता आवश्यक असेल. गटातून कर्ज देण्यासंदर्भात निर्णय घेताना त्या व्यक्तीची असहाय्यता लक्षात घेऊन त्यानुसार त्या व्यक्तिला प्राधान्य दिले जाईल. हे गट अपंगाचे असल्याने (विशेष गट) काही अडचणीही लक्षात घ्यायला हव्यात.

1. गावातील अपंगांची संख्या (जवळपासच्या गावातील)
2. एकाच प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती
3. अपंग व्यक्तींमधील स्त्री-पुरुष प्रमाण.
4. अपंग स्वयंसहाय्यता गटांचे सदस्य बनण्यासाठीचा वयोगट
5. बहुविकलांगता, मानसिक आजार, मतिमंदत्व आणि मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या व्यक्तींच्या समवेशासंदर्भातील अडचणी.

एखाद्या भागात अपंग व्यक्तींची संख्या अगदी कमी असण्याची बरीच शक्यता आहे. अशा परिस्थितीत जर पाच अपंग व्यक्तींना एकत्र आणता आले, तर त्यांचाही स्वयंसहाय्यता गट तयार होऊ शकेल. जिथे पाच पेक्षा कमी अपंग असतील, तिथे त्यांच्यासाठी वैयक्तिक लाभाच्या उपक्रमांना प्राधान्य दयावे. इतर स्वयंसहाय्यता गटामध्येही अपंग व्यक्तींचा समावेश करता येऊ शकेल. एकाच प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या अनेक व्यक्ती एकाच गावात असण्याची शक्यताही खूपच कमी आहे. अशावेळी वेगवेगळ्या प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणून त्यांचे स्वयंसहाय्यता गट तयार करता येऊ शकतील. अपंग स्त्री-पुरुष प्रमाणाबाबतही हेच तत्व लागू करता येईल. यात अपंग मुलांच्या भवितव्याचाही विचार करावा लागेल.

**अपंग स्वयंसहाय्यता गट बांधणीची मार्गदर्शक तत्वे:**

१. गटात कमीत कमी ५ सदस्य असावेत. पण, १० पेक्षा जास्त नकोत.
२. जर एकाच प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींची संख्या पुरेशी असेल, तर एकजिनसी गट तयार करता येऊ शकेल. उदा. अंध व्यक्तींचे गट, कर्णबधीर व्यक्तींचे गट इत्यादी. त्याचप्रमाणे पुरेशी संख्या असेल, तर स्त्रिया आणि पुरूषाचे स्वतंत्र गट तयार करता येतील. उदा. अपंगत्व असणाऱ्या फक्त स्त्री सदस्यांचा गट. पण, बरेच वेळा असे निदर्शनास आले आहे की, गावपातळीवर मिश्र गट (भिन्न अपंगत्व स्त्री, पुरुष) करणे जास्त सुकर ठरते.
३. गटातील सदस्य १८ ते ६० वयोगटातील असावेत. बहुविकलांग, मानसिक रुग्ण, मतिमंद आणि काही वेळा मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या व्यक्तींबाबत त्यांचे पालक/कायदेशीर पालक/काळजी वाहक या गटाचे सदस्य असतील. संबंधित अपंग व्यक्तींना त्यांच्यामार्फत गटाचे लाभ मिळवून देता येतील. या गटातील अन्य सदस्यांनी संबंधित अपंग व्यक्तींपर्यंत गटाचे फायदे पोहोचतात की नाही, यावर लक्ष ठेवायला हवे.
४. स्वयंसहाय्यता गटाची व्यापकता वाढवण्यासाठी - बहुविकलांग, मानसिक रुग्ण, मतिमंद आणि मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या व्यक्तींच्या पालकांप्रमाणेच, १८ वर्षांखालील अपंग मुलांचे पालकही स्वयंसहाय्यता गटाचे सदस्य होऊन आपल्या पाल्याला गटाचे लाभ मिळवून देऊ शकतील. मुलाने १८ वर्ष पूर्ण केल्यावर मात्र या पालकांचे सदस्यत्व रद्द होऊन त्यांचे पाल्य स्वतःच गटाचे सदस्य बनतील.
५. बहुविकलांग, मानसिक रुग्ण, मतिमंद, मेंदूचा पक्षाघात झालेल्या प्रौढ व्यक्तींच्या कायदेशीर पालकांना या गटाचे सदस्य होण्याची इच्छा असल्यास जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांनी नॅशनल ट्रस्ट ॲक्ट १९९९ नुसार त्यांचे कायदेशीर पालकत्व खरे असल्याचे तपासून पहायला हवे.
६. नॅशनल ट्रस्ट ॲक्ट १९९९ अन्वये बहुविकलांग, मानसिक रुग्ण, मतिमंद आणि मेंदुच्या पक्षाघाताच्या रूग्णांच्या पालकांचा स्वयंसहाय्यता गट केल्यास त्या गटालाही 'अपंग स्वयंसहाय्यता गट' म्हणता येईल.

७. उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या पुढाकाराने इतर व्यक्ती आणि अपंग व्यक्तींचा एकत्र गट तयार केला, तर अशा गटाला 'एकात्मिक गट' म्हटले जाईल.

८. जर एखादी अपंग महिला आधीच एखाद्या बचतगटाची सदस्य असेल, तर तिला त्याच गटात राहण्याचे किंवा अपंग स्वयंसहाय्यता गटाचे सदस्य होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. तिला एकाच वेळी दोन्ही गटांचे सदस्य मात्र होता येणार नाही. जर तिने आधीच्याच बचतगटाचे सदस्य राहण्याचे ठरवले तर तिला 'अपंग' म्हणून मिळू शकणारे सर्व फायदे मिळायला हवेत.

९. गटबांधणी करण्यासाठी सदस्यांनी एक ठराव संमत करावा. त्यात ते सर्व अपंग स्वयंसहाय्यता गट तयार करण्यासाठी एकत्र आले असल्याचा उद्देश नमूद असावा. या ठरावात त्यांनी अध्यक्ष, सचिव, खजिनदार कोण असतील हे ही नमूद करावे. गटामध्ये दरमहा किती बचत जमा करायची हे त्यांनी बैठक घेऊन ठरवावे. त्यानुसार पैसे गोळा करावे आणि तालुका पातळीवरील उमेद गट संचालित बँक खात्यात हे पैसे जमा करावेत. अपंग स्वयंसहाय्यता गटाच्या तीन बैठका झाल्यानंतर गटाने बँकेत बचत खाते उघडायला हवे. जिथे बँकेच्या शाखा खूप दूर असतील अशा ठिकाणी पोस्टामध्ये बचत खाते उघडले तरी चालेल. परंतु, जेव्हा बँकेचे कर्ज घेताना गट बँकेशी जोडले जातील, तेव्हा हे पोस्टातील बचत खाते उपयोगी ठरणार नाही. गट ज्यावेळी बँकेशी जोडला जाईल (राष्ट्रीयकृत बँक, ग्रामीण बँक, सहकारी बँक इत्यादि प्रकारच्या बँकांशी), तेव्हाच गटाला अधिकृत अपंग स्वयंसहाय्यता गट म्हणून मान्यता मिळेल.

**अपंग स्वयंसहाय्यता गट कोण करू शकेल?**

उमेद अभियानामध्ये अपंगांच्या गटांची बांधणी व त्या गटांचे संवर्धन करण्याची प्रमुख जबाबदारी गावातील प्रेरिका, प्रभाग समन्वयक आणि तालुका अभियान व्यवस्थापक यांची राहील.

**उमेद अभियानांतर्गत अपंग स्वयंसहाय्यता गटाच्या पात्रतेचे निकष:**

१. गटाचे सदस्य त्याच किंवा नजिकच्या गावात राहणारे असावेत.
२. अपंग स्वयंसहाय्यता गटाचे ८० टक्के सदस्य अपंगत्व असणारे असावेत.
३. गटाने नियमित बैठक घ्यायला हवी.
४. अपंग व्यक्तींना येण्याजाण्यास सोईचे असेल असेच ठिकाण बैठकीसाठी निवडावे.
५. आर्थिक गटाच्या व्यवहाराचा हिशोब गटानेच ठेवावा.
६. दर तीन वर्षांनी गटप्रमुख बदलण्यात यावा. गटप्रमुख म्हणून सदस्यांची निवड सहमतीने करावी.
७. गटाच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता असावी तसेच सर्वसहमतीने निर्णय घेतले जावेत.
८. सुरूवातीला कमी मुदतीची व कमी रकमेची कर्जे द्यावीत.

९. सदस्याला कर्ज देण्याआधी त्याची गरज आणि आर्थिक / उपजिविकेच्या संधी परिस्थिती यांची पडताळणी गटाने करावी. मगच कर्ज देण्याबाबत निर्णय घ्यावा.

१०. बचत आणि व्याजबाबतचे नियम गटाने ठरवावेत.

११. गटाच्या तीन बैठका झाल्यानंतर गटाने बँकेत बचत खाते उघडायला हवे. त्याआधी बँकेत बचत खाते उघडण्यासाठी सदस्यांची संमती असल्याचा ठराव गटात संमत करून घ्यायला हवा. त्यावर गटातील सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करायला हवी.

१२. कमीत कमी दोन ते तीन महिन्याची सामाईक बचत सदस्यांना कर्ज देण्यासाठी वापरता येऊ शकेल.

१३. गट कमीत कमी सहा महिने व्यवस्थित चालू असेल आणि कर्ज, तसेच व्याज परतफेड नियमित होत असेल, तर हा गट बँकेशी आणि इतर वित्तिय संस्थाशी जोडला जाऊ शकतो.

१४. गटातील प्रत्येक सदस्याकडे बँकेच्या पास बुकाबरोबरच गटाचे पासबुकही असावे. हे पासबुक नियमित भरले जावे. गावपातळीवर काम कारणाऱ्या उमेद गटाच्या कार्यकर्त्यांनी पासबुक नियमित भरले जाते आहे, याची खात्री करून घ्यावी व त्याबाबतचा नियमित अहवाल तालुकपातळीवरील उमेद च्या टीमला द्यावा.

१५. नेतृत्व विकास प्रशिक्षणामध्ये अपंग व्यक्तींचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांना स्वतःचे उद्योग सुरू करण्यासाठी उद्युक्त करावे असा उद्देश आहे. त्यामुळे हे प्रशिक्षण गावपातळीवर जर MIP (सूक्ष्म नियोजन आराखडा) प्रकियेच्या आधी करणे जास्त उपयुक्त होईल. त्याप्रमाणे जिल्हयानी नियोजन करावे.

१६. अपंग स्वंयसहाय्यता गट हा समुदाय गुंतवणूक निधी (कम्यूनिटी इन्व्हेस्टमेंट फंड) मिळण्यास पात्र असेल. त्यासाठी त्यांनी सूक्ष्मनियोजन (मायक्रोप्लॅन) करणे गरजेचे असेल.

१७. उमेद अभियान / महाराष्ट्र राज्य गृह वित्त विकास संधान संस्था व इतर शासकीय, निमशासकीय संस्थांच्या वित्तीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अपंग स्वंयसहाय्यता गट पात्र असेल.

१८. सर्व अपंग स्वंयसहाय्यता गट हे ग्रामसंघाचे सदस्य असतील. त्यामुळे, या संघांना सध्या मिळत असणारे लाभ त्याचबरोबर भविष्यात वेळोवेळी मिळणारे लाभ मिळायला या गटातील सदस्यही पात्र असतील. एखाद्या कुटुंबात अपंग व्यक्ती असल्यामुळे त्या कुटुंबाची जी जोखमीची / असहाय्य परिस्थिती असते, ती लक्षात घेऊन अशा कुटुंबातील एखादी महिला इतर बचत गटात सदस्य असेल तरीही या कुटुंबाला ग्रामसंघांना / गावाला मिळणाऱ्या योजनांचा लाभ घेता येईल.

१९. अपंगांच्या गटाची बांधणी याची मुख्य जबाबदारी सामाजिक समावेशन आणि संस्था बांधणी (IB)क्षमता बांधणी (CB) या विभागाची असेल, मात्र 'फिरता निधी', बँक लिंकेज याची मुख्य जबाबदारी ही 'वित्तीय समावेशन' विभागाची असेल. तसेच पुढे अपंगांच्या

गटांचे MIP करणे आणि त्यांच्या शाश्वत उपजीविकेचे जबाबदारी ही उपजीविका - फार्म आणि नॉन फार्म या विभागाची असेल.

**गटातील व्यवहारांच्या नोंदी :**

गटांच्या प्रत्येक बैठकीची नोंद ठेवली जायला हवी. या बैठकांमध्ये झालेली चर्चा, घेतलेले निर्णय यांचीही सविस्तर नोंद ठेवायला हवी. गटात झालेल्या आर्थिक व्यवहारांची नोंद सदस्याच्या पासबुकात, गटाच्या पासबुकात तसेच लेजरबुकमध्ये व्हायला हवी.

**गटांतर्गत कर्ज वाटप आणि बँकेचे कर्ज :**

बँकेकडून कर्ज मिळण्यास पात्र ठरण्यासाठी गटांतर्गत कर्ज वितरण झाले पाहिजे. या कर्जांच्या परतफेडीवर काटेकोर लक्ष ठेवायला हवे. गटामध्ये कर्जफेड नियमित होते की नाही, यावर बँक किमान २ महिने लक्ष ठेवते आणि परतफेड समधानकारक असेल तरच गटाला कर्ज दिले जाते. बँकेशी गट जोडण्यासाठी त्या गटाने किमान ३ महिने नियमित बचत जमा करणे आवश्यक असते. तरच गट बँकेशी संलग्न व्हायला पात्र ठरतो.

**अपंग स्वयंसहाय्यता गटांचे वर्गीकरण :**

अपंग गटांचे वर्गीकरण करण्यासाठी गटाचा कालावधी (गट कधी पासून अस्तित्वात आहे), गटाचा आर्थिक पाया, गटातील पैशांची देवाणघेवाण, कर्ज परतफेड हे मुद्दे विचारात घेतले जातील. त्यानुसार गटांना अ,ब,क,ड असा दर्जा दिला जाईल. गट बँकेशी संलग्न करताना तसेच गटांना किती रकमेची / कोणत्या प्रमाणात कर्जे द्यायची हे ठरवताना मापदंड लाऊन गटाचे मूल्यमापन करता येईल. या दर्जानुसार हे गट इतर वित्तीय संस्थाकडून (केंद्र / राज्य / स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी) अर्थसहाय्य मिळण्यास पात्र ठरतील.

**उमेद अभियानांतर्गत अपंग स्वयंसहाय्यता गटाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या :**

१. बैठक - सदस्याने गटाच्या बैठकांना नियमित हजर राहायला हवे. तसेच या बैठकांत भाग घेऊन आपले मत मांडायला हवे.
२. गरजांची पडताळणी - अपंग स्वयंसहाय्यता गटातील प्रत्येक सदस्याच्या गरजांचा काळजीपूर्वक अभ्यास करायला हवा. आर्थिक व्यवहारांशिवाय गटाने आपल्या सदस्यांच्या मूलभूत गोष्टींकडेही लक्ष पुरवायला हवे. उदा. अपंगत्वाचे प्रमाणपत्र किंवा इतर दाखले मिळण्याबाबत.
३. वैयक्तिक सहाय्यक उपकरणे मिळण्याबाबत - अपंग स्वयंसहाय्यता गटाने आपल्या सदस्यांना आवश्यक असणारी उपकरणे उदा. कुबडया, श्रवणयंत्रे, चाकाची खुर्ची, कृत्रिम पाय, हात इत्यादी मिळण्याबाबत नजिकच्या पुनर्वसन केंद्राशी संपर्क करावा.

४. विकासात्मक कार्यक्रमांत सहभाग - गावपातळीवर चालणाऱ्या विविध विकासात्मक कार्यक्रमात अपंग स्वयंसहाय्यता गटाचे अस्तित्व लक्षात यावे, यासाठी गटप्रमुखाने प्रयत्न करायला हवेत. उदा. ग्रामसभेत सहभागी होणे, इतर विकासात्मक कामात सहभागी होणे, तसेच पंचायतीकडे अपंगांसाठी असणाऱ्या निधीचा योग्य विनियोग व्हावा यासाठी ग्रामपंचायत सदस्यांच्या संपर्कात राहणे.

५. जाणीव जागृती - अपंग व्यक्ती, इतर समाज, शासन यांच्यामध्ये अपंगत्वाबाबत जाणीव जागृती व्हावी यासाठी संवाद, साधने, माहिती प्रसारित करणे.

६. आत्मविश्वास जागवणे - अपंग व्यक्तींमध्ये असलेल्या क्षमतांची जाणीव करून देऊन बदल घडवण्याची क्षमता त्यांच्यात आहे असा आत्मविश्वास जागवणे. त्यासाठी निरीक्षणे, अनुभवांची देवाणघेवाण करणे, अपंगाच्या यशस्वितेची उदाहरणे देणे, अपंगांच्या संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणे, अपंगत्व आणि त्याबाबतच्या प्रश्नांबद्दल माहिती देऊन जाणीवजागृती करणे, अपंगांच्या हक्कांबद्दल जाणीव जागृती करणे इत्यादी.

७. प्रशिक्षण - गटातील प्रत्येक सदस्याच्या गरजा लक्षात आल्यानंतर त्यांच्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करावे. या प्रशिक्षणात चर्चा, कौशल्यांची देवाणघेवाण, चर्चासत्रे, क्षेत्रभेटी, व्याख्याने यांचा समावेश असावा.

८. प्रेरणा - अपंग स्वयंसहाय्यता गटातील सर्व सदस्यांना गटाची ध्येय-उद्दिष्टे माहिती असावीत. अपंग स्वयंसहाय्यता गट म्हणजे काय, उद्दिष्टे काय आहेत, त्या गटाची धोरणे काय आहेत. याची संपूर्ण जाणीव सदस्यांना असावी. इतर समाजाला, इतर अपंगांना प्रेरीत करण्यासाठी सदस्य स्वत: सक्षम असायला हवेत.

९. गटाचे नियम, धोरण आणि तत्व ठरवणे - गटाने आपले नियम व कार्यपध्दतीची मार्गदर्शक तत्वे स्वत:च ठरवावीत आणि त्याला गटातील सर्व सदस्यांची एकमताने स्वीकृती असावी.

१०. बचत व कर्ज वाटपाबाबतची धोरणे - गटातील सर्व सदस्यांना सहज शक्य होईल अशी रक्कम एकमताने ठरवून त्याप्रमाणे गट स्थापन झाल्यावर लगेचच तेवढी रक्कम बचत म्हणून जमा करण्यास सुरुवात करावी. गटातील सर्वात गरीब सदस्याला बचत जमा करणे शक्य होईल, अशीच रक्कम ठरवली जावी. बचत जमा करण्याचा कालावधी गटाने ठरवावा. त्यानुसार दर आठवड्याला किंवा महिन्याला बचत जमा करावी, क्रेडिट मिळण्यास पात्र ठरण्यासाठी गटांतर्गत कर्ज देण्याची प्रक्रिया ही त्यानंतरची दुसरी पायरी असेल.

११. फिरता निधि (revolving fund) - गटाच्या दर्जानुसार आपला गट फिरता निधि मिळण्यास पात्र व्हावा, यासाठी गटाने प्रयत्न करावे.

१२. समुदाय गुंतवणूक निधी (कम्युनिटी इनव्हेस्टमेंट फंड) - प्रत्येक अपंग स्वयंसहाय्यता गटाने सूक्ष्म नियोजन तयार करावे, जेणेकरून कम्युनिटी इनव्हेस्टमेंट फंड मिळण्यास गट पात्र ठरेल.

१३. सामाजिक उपक्रमात सहभाग गटातील सदस्यांनी व्यक्ती, गट, समाज यांच्यासाठी असलेल्या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे. गावपातळीवर होणाऱ्या विविध विकासात्मक कामात सहभागी होण्यासाठी गटसदस्यांना प्रोत्साहन द्यावे. उदा: गावातील बैठका, रस्ते बांधणी किंवा दुरूस्ती, शाळा समित्या, आरोग्य कार्यक्रम, पिण्याच्या पाण्याची सोय, कृषि विकास कार्यक्रम, वनविकास कार्यक्रम, उद्योगधंदे इत्यादी. या पध्दतीने अपंग व्यक्ती आपल्याकडील इतर क्षमता समाजाला देऊन समाजाचा आदर प्राप्त करून घेऊ शकतील.

१४. संपर्काचे जाळे (नेटवर्किंग) - अपंग स्वयंसहाय्यता गटाने शासकीय कल्याणकारी आणि विकास योजनांची माहिती मिळवायला हवी आणि विविध विभागांशी सहकार्य प्रस्थापित करायला हवे.